# श्री साईसच्चरित.

जैसें शारदीचिये चंद्रकळे ॥ माजी अमृतकण कोंवळे ॥
ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ॥
तियां परि श्रोतां । अनुभवावी हे कथा ॥
अति हळुवार पण चित्ता । आणूनियां ॥

* * *

हें सलगी म्यां म्हणितलें । चरणा लागोनि विनविलें ॥
प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणऊनियां ॥
जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ॥
तरी अधिक तयाचा । संतोष आथी ॥
तैसा तुम्ही मी अंगिकारिला ॥ सज्जनीं आपुला म्हणीतला ॥
तरी उणें सहजें उपसाहाला । प्रार्थूं काई ॥

* * *

हें अनावर न विचारतां । वायांचिधिंवसा उपनला चित्ता ॥
येऱ्हवीं काय भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ॥
कीं टिटिभू चांचूवरी । माप सूये सागरीं ॥

मी नेणतू त्यापरी । प्रवर्तें एथ ॥
आयका आकाश गिंवसावें । तरी आणिक त्याहुनी थोर होआवें ॥
म्हणऊनि अपाडहें आघवें । निर्धारितां ॥

* * *

हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें धवळावें ॥
गगन मुठीं सुवावें । मशकें केंवीं ॥
परी एथ असे एक आधारु । तेणेंचि बोले मी सधरू ॥
जें सानुकूळ श्रीगुरू । ज्ञानदेव म्हणे ॥
येऱ्हवीं तरी मी मुर्खु । जरी जाह्ला अविवेकु ॥
तऱ्ही संतकृपा दीपकु । सोज्वळू असे ॥
लोहाचें कनक होय । हें सामर्थ्य परिसींच आहे ॥
कीं मृतही जीवितलाहे । अमृत सिद्धी ॥
जरी प्रगटे सिद्ध सरस्वती । तऱ्ही मुकया आथी भारती ॥
एथ वस्तु सामर्थ्यशक्ती । नवल कायी ॥
का जयातें कामधेनू माये । तयासी अप्राप्य कांहीं आहे ॥
म्हणऊनि मी प्रवर्तां लाहे । ग्रंथीं इये ॥
तरी न्युनतें पुरतें । अधिक तें सरतें ॥
करोनि घ्यावें हें तुमतें । विनवीत असें ॥
आतां देइजे अवधान । तुम्ही बोलविला मी बोलेन ॥
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारूयंत्र ॥

तैसा मी अनुग्रहीतु । साधूंचा निरूपितु ॥
ते आपला अलंकारितु । भलतयापरी ॥

ज्ञानेश्वरी अ० १

*     *     *

सेवंतिये रसिकांहीं । आंग पाहतां विशेषु नाहीं ॥
परि सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं जाणिजे ॥
तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें तें मज देइजे ॥
जें नेणणें हेंचि सहजें । रूपकीं बाळा ।
तरी नेणतें जऱ्ही होयें । तऱ्ही देखोनि बापकीं माये ॥
हर्ष केंहीं न समाये । चोज करिती ॥
तैसें संत माहेर माझें । तुम्ही मिनलिया मी लाडें जें ॥
तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी
आतां विश्वात्मकू हा माझा । स्वामीश्रीनिवृत्तिराजा ॥
तो अवधारू वाक्य पूजा । ज्ञानदेवो म्हणे ॥

ज्ञानेश्वरी अ० १५

